महाराष्ट्र पोलीस

# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

**प्रेसनोट** दिनांक:- ०८/१०/२०१८

## धुळे येथे झालेल्या ३१ व्या नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेमध्ये नाशिक ग्रामीण पोलीस दलाने पटकविली जनरल चॅम्पियनशिप

---

धुळे जिल्हा पोलीस मुख्यालयाचे पोलीस परेड मैदानावर दिनांक ०१ ऑक्टोबर २०१८ रोजी पासुन **३१ व्या नाशिक परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धांचे** आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत नाशिक शहर पोलीस आयुक्तालय, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्हयातील एकुण ९०० पोलीस खेळाडुंनी सांघिक व वैयक्तिक क्रिडा प्रकारात सहभाग नोंदविला होता. सदर स्पर्धेचा आज दिनांक ०८ ऑक्टोबर २०१८ रोजी सायंकाळी पोलीस कवायत मैदान, धुळे जिल्हा पोलीस मुख्यालय येथे भव्य समारोप सोहळा पार पडला. समारोप कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक **डॉ. श्री. छेरिंग दोरजे सो** व धुळे जिल्हयाचे **जिल्हाधिकारी मा.श्री. राहुल रेखावत** हे उपस्थित होते. प्रमुख अतिथींचे स्वागत समारंभानंतर कार्यक्रमास सुरूवात झाली, समारोप सोहळयास उपस्थित असलेले मान्यवर व नागरीकांसाठी आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात सादर केलेल्या विविध प्रात्यक्षिकांनी कार्यक्रमाची शोभा व्दिगुणित केली. त्यानंतर नाशिक शहर पोलीस आयुक्तालय व परिक्षेत्रातील ०५ ही जिल्हयांचे पोलीस खेळाडु यांनी शानदार संचलन करून उपस्थित मान्यवर व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना मानवंदना दिली.

सदर कार्यक्रमानंतर क्रिडा स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक खेळांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडुंचा प्रमुख अतिथींचे हस्ते बक्षिस वितरण समारंभाचा कार्यक्रम पार पडला. **३१ व्या परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेमध्ये नाशिक ग्रामीण पोलीस दलातील** खेळाडूंनी सांघिक व वैयक्तिक क्रिडा प्रकारात घवघवीत यश संपादन करून सदर स्पर्धेत ॲथेलॅटिक्स, फुटबॉल, कबड्डी, खो-खो, बॉक्सिंग, वेट लिफ्टिंग, स्विमिंग, क्रॉस कंट्री, ज्युदो, कुस्ती या क्रिडा प्रकारांमध्ये अव्वल स्थान पटकावुन १३० गुणांसह **नाशिक ग्रामीण पोलीस दलाने ''जनरल चॅम्पियनशिप''** मिळविण्याचा मान पटकाविला. नाशिक शहर पोलीस आयुक्तालयास व्दितीय, तर जळगाव जिल्हयास तृतीय क्रमांकाचे बक्षिस मिळाले. सदर स्पर्धेत **नाशिक ग्रामीण पोलीस दलाची** महिला पोलीस खेळाडु **कु.योगिता वाघ** हिने बेस्ट ॲथलिटचा किताब पटकाविला. तसेच नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे राष्ट्रीय पोलीस खेळाडु शिरीष चव्हाण, समाधान गवळी, संजय आहेर, पोउनि भरत चौधरी, पोकॉ सचिन पिंगळ, शरद धात्रक, बाळु भोर, विकास गिते, बापुराव पगारे, महिला पोकॉ पुनम घुगे, योगिता वाघ, उर्मिला बिस्ट, कोजागिरी बच्छाव यांनी वैयक्तिक क्रिडा प्रकारांमध्ये सुवर्ण पदकांची कामगिरी करून लक्ष वेधले.

बक्षिस समारंभानंतर नाशिक परिक्षेत्राचे **विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. छेरिंग दोरजे सो.** यांनी उपस्थित मान्यवर, पोलीस अधिकारी व कर्मचारी, तसेच नागरीकांचे आभार मानले तसेच परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेत यश संपादन करणारे खेळाडुंना राज्यस्तरीय पोलीस क्रिडा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. पोलीस खात्यातील धकाधकीचे जीवनात ताणतणाव कमी करण्यासाठी व आरोग्य चांगले राहण्यासाठी सदर क्रिडा स्पर्धा उपयुक्त ठरतात व सांघिक भावना वाढीस लागते असे मनोगत व्यक्त केले.

**मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साो.** यांचे मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस दलाने परिक्षेत्रीय क्रिडा स्पर्धांमध्ये **सलग दुस-यांदा ‘‘जनरल चॅम्पियनशिप’’** पटकाविली आहे. सदर स्पर्धेमध्ये ग्रामीण पोलीस खेळाडुंनी केलेल्या उल्लेखनीय कामिगरीबद्दल मा.पोलीस अधीक्षकांनी हार्दिक अभिनंदन केले असुन राज्यस्तरीय पोलीस क्रिडा स्पर्धेस शुभेच्छा दिल्या आहेत. नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. नीलोत्पल, पोलीस उपअधीक्षक मुख्यालय श्री. सुरेश जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा श्री. अशोक करपे, राखीव पोउनि श्री. साहेबराव जाधव यांनी सर्व खेळाडुंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. **नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे क्रिडा प्रशिक्षक राष्ट्रीय खेळाडु श्री. समाधान गवळी** यांचे नेतृत्वाखाली **ग्रामीण पोलीस दलाने जनरल चॅम्पियनशिप** मिळविली असुन पोलीस अधीक्षकांनी त्यांचे विशेष आभार व्यक्त केले आहे.

सदर कार्यक्रमास नाशिक परिक्षेत्राचे **विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. छेरिंग दोरजे साो.** नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे साो**, अहमदनगर पोलीस अधीक्षक **श्री. रंजनकुमार शर्मा साो,** जळगाव पोलीस अधीक्षक **श्री. दत्तात्रय शिंदे सो,** धुळे पोलीस अधीक्षक **श्री. विश्वास पांढरे साो,** नंदुरबार पोलीस अधीक्षक **श्री. संजय पाटील साो** यांचेसह परिक्षेत्रातील वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच नामांकित लोक प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरीक, वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील नागरीकांचे विशेष उपस्थितीत सदर कार्यक्रम पार पडला.